# भुयारीकरणाचा दुसरा टप्पा पूर्ण; सीप्झ मेट्रो स्थानकात वैनगंगेची मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन अंतर्गत मुंबई मेट्रो लाइन ३ च्या सातव्या पॅकेजमधील सीप्झ स्थानकावर भुयारीकरणाचा दुसरा टप्पा बुधवारी पूर्ण झाला. वैनगंगा २ या टनेल बोअरिंग मशीनने २३ ऑगस्ट २०१७ रोजी सारीपुत नगर लॉंचिंग शाफ्ट येथून हे काम सुरु केले होते. ५६८ मीटर इतके भुयारीकरण अवघ्या १२५ दिवसांत २५० पेक्षा अधिक अभियंते आणि इतर कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमाने पूर्ण करण्यात आले.

वैनगंगा २ हे यंत्र प्रतिदिन १० ते १३ मीटर इतके भुयार तयार करते. हे भुयार एकूण ४०५ आरसीसी सिमेंटने तयार करण्यात आले आहे. भविष्यात मुंबई मेट्रो ३ मार्गिका छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, आरे कॉलनी त्याचप्रमाणे वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो १ मार्गिका, आणि स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी-कांजूरमार्ग-विक्रोळी मेट्रो ६ मार्गिका व सीप्झ, एमआयडीसीसारख्या व्यावसायिक क्षेत्राला जोडली जाणार आहे. एमएमआरसीने आतापर्यंत १५ किलोमीटर इतके भुयारीकरण पूर्ण केले आहे.



भुयारीकरणासाठी वापरण्यात आलेले वैनगंगा २ हे यंत्र प्रतिदिन १० ते १३ मीटर इतके भुयार तयार करते.

एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी यासंदर्भात बोलताना सांगितले की, या प्रकल्पामध्ये कार्यरत प्रत्येकाच्या अथक परिश्रमामुळे भुयाराचा दुसरा टप्पा पूर्ण करण्यात यश मिळाले आहे.